दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ७ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर,
युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम
संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण,
वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, पंचमी
संध्याकाळी ४-३५ पर्यंत,
दिवस नक्षत्र – ज्येष्ठा रात्री (बुधवारच्या पहाटे)
५-५४ पर्यंत, चंद्र रास- वृश्चिक बुधवार पहाटे
५-५४ पर्यंत, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन

### इराणकडून भारताचे कौतुक

**नवी दिल्ली:** युद्ध टाळण्यासाठी पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्की अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थी करत आहेत, परंतु अद्याप कोणताही अंतिम मसुदा तयार झालेला नाही. इराणने भारताच्या मुत्सद्देगिरीचे कौतुक केले आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्यांचे प्रतिनिधी अब्दुल माजिद हकीम इलाही यांनी म्हटले आहे की, या संघर्षात भारत मोठी भूमिका बजावू शकतो.भारताची मुत्सद्देगिरी खूप चांगली आहे आणि ते या प्रकरणात मोठी भूमिका बजावू शकतात, असे ते म्हणाले.

## सारांश वृत्त

### अज्ञातांकडून पोलीस अधिकाऱ्याची हत्या

**पेशावर :** वायव्य पाकिस्तानात सोमवारी अज्ञात बंदूकधाऱ्यांनी दोन वेगवेगळ्या हल्ल्यांमध्ये तीन सुरक्षा कर्मचारी ठार केले, अशी माहिती पोलिसांनी दिली. हे हल्ले खैबर पख्तुनख्वा प्रांतातील बन्नू जिल्ह्यात झाले. एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पहिली घटना मंदानच्या कांगेर जान बहादूर परिसरात घडली, जिथे कर्तव्यावर जात असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली.

### गांदरबल चकमक चौकशीचे आदेश योग्य

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोमवारी गांदरबल चकमकीची न्यायालयीन किंवा दंडाधिकारी चौकशी करण्याचे आदेश द्यावेत की नाही या चर्चेत पडण्यास नकार दिला आणि तातडीने चौकशीची गरज असल्याचे सांगितले. लष्कराने दावा केला आहे की, ३१ मार्च रोजी अरहामा जंगलात झालेल्या चकमकीत ठार झालेला गंदरबलचा रशीद अहमद मुघल हा एक दहशतवादी होता. त्याच्या कुटुंबीयांनी आरोप केला आहे की, त्याचा दहशतवादाशी कोणताही संबंध नव्हता आणि ही चकमक बनावट असल्याचे म्हटले आहे.

### बोम्मई यांनी मानद डॉक्टरेट नाकारली

**बंगळूर :** भाजप खासदार आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी हावेरी विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट स्वीकारण्यास नकार दिला आहे. राजकारण्यांना किंवा स्वयंप्रेरित समाजसेवेत गुंतलेल्यांना असे सन्मान प्रदान करणे योग्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. लोकांचे प्रेम आणि विश्वास हाच सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठा सन्मान आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

### शेतकरी कर्जमाफी योजनेच्या प्रक्रियेनंतरच नवीन पीक कर्जाचे वितरण

# शेतकऱ्यांना कोणतेही नवे कर्ज नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्या पीक कर्जाच्या वाटपात विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच नवीन पीक कर्जाचे वितरण सुरू होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे कर्जमाफीची अंमलबजावणी लांबली, तर त्याचा थेट परिणाम पीक कर्ज वितरणावर होईल, असा इशारा जाणकार देत आहेत.

सध्या मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही. तांत्रिक पातळीवरील प्रक्रिया सुरू असून, सरकारने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार आहे. हा अहवाल एप्रिलच्या पंधरवड्यात सादर होण्याची अपेक्षा व्यक्त केली असली तरी प्रत्यक्षात त्याला विलंबाची शक्यता आहे.

कर्जमाफी प्रक्रिया अद्याप सुरू नसल्याने नवीन पीक कर्ज वितरणात विलंब होण्याची शक्यता आहे. यंदाचा खरीप हंगाम तोंडावर असून, पीककर्ज वाटपाच्या विलंबामुळे पेरणीपूर्व तयारीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांची स्थिती, कर्जरचनेचे स्वरूप, बँकांचा सहभाग आणि कर्जमाफीचा एकूण आर्थिक परिणाम यांचा सखोल अभ्यास करणे समितीसमोर मोठे आव्हान आहे. त्यामुळे अहवाल तयार होण्यास अधिक वेळ लागू शकतो, असे जाणकारांचे मत आहे.

कर्जमाफी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच बँकांकडून नवीन पीक कर्जाचे वितरण सुरू होणार असल्याने यंदाच्या कर्जवाटपात विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत पीककर्ज असलेले शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरतील. नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणा करण्यात आली आहे. एप्रिलमध्ये समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफी प्रक्रिया वेगाने सुरू होईल आणि ३० जून पर्यंत लाभ मिळण्याची शक्यता आहे.

**तांत्रिक प्रक्रिया सुरू !**

● राज्य सरकारने २०२६ च्या अर्थसंकल्पात ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे २ लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्याची घोषणा केली असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी ३० जून पूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या पात्र शेतकऱ्यांच्या याद्या निश्चित करण्यासाठी उच्चस्तरीय समिती काम करत आहे. या प्रक्रियेत बँक डेटा, जमीन मालकी दस्तऐवज आणि इतर तपासण्या समाविष्ट आहेत.

# मालदा प्रकरणाचा तपास एनआयएकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी मालदा जिल्ह्यातील विशेष गहन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेत गुंतलेल्या सात न्यायिक अधिकाऱ्यांवरील घेराव आणि हल्ल्याशी संबंधित प्रकरणे राष्ट्रीय तपास संस्थेकडे हस्तांतरित केला आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, पश्चिम बंगालच्या नोकरशाहीची विश्वासार्हता कमी केली जात आहे आणि सचिवालय तसेच सरकारी कार्यालयांमध्ये राजकारणाचे हस्तक्षेप केले जात आहे. मालदा घटनेमध्ये राज्य पोलिसांनी अटक केलेल्या २६ जणांची, जे न्यायालयीन कोठडीत आहेत, एनआयए मार्फत चौकशी करावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला.

१ एप्रिल रोजी न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला होता. त्या दिवशी कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचे फोन न उचलल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालचे मुख्य सचिव दुष्यंत नरिया यांना फटकारले. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, मालदा येथील घटना, ज्यात एसआयआर प्रक्रियेत गुंतलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना तासनतास घेराव घालण्यात आला, जे पूर्वनियोजित आणि हेतुपुरस्सर होते. पश्चिम बंगाल, ओडिशा आणि झारखंड येथील सातशे न्यायिक अधिकाऱ्यांना ही प्रक्रिया हाताळण्यासाठी तैनात करण्यात आले होते. या निर्णयामुळे, मालदा प्रकरणाची चौकशी आता एनआयएकडे आला आहे.

# पार्थ पवार यांनी दिला काँग्रेसला थेट इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** बारामती मतदारसंघातील निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीकडून प्रयत्न करण्यात आले होते. मात्र महाविकास आघाडीतील काँग्रेसने उमेदवार देण्याचा निर्णय घेतल्याने बारामतीतील निवडणूक लढत अटळ झाली आहे. त्यामुळे पार्थ पवार यांनी काँग्रेसला थेट इशारा दिला आहे. "माझं कुणाशी बोलणं झालं नाही. काँग्रेसला काय करायचं ते कळायला पाहिजे. त्यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाबाबत मला माहिती नाही. सगळे मोठे लोक आहेत, सर्वांना माहिती आहे काय चाललंय. त्यांनी विचार केला असेल तर करू द्या. पण नंतर महाराष्ट्रात त्यांना काय त्रास होईल, हे त्यांना दिसेल," असे पार्थ पवार यांनी म्हटले.

ते म्हणाले, "लोक विसरत नाहीत. दादांबद्दल लोकांच्या मनात प्रेम आहे. अशावेळी एवढ्या मोठ्या आणि परिपक्व पक्षाने असा निर्णय घेणे चुकीचे आहे. आम्ही कोणाला थांबवू शकत नाही. जशी वेळ येईल तसं सामोरं जावं लागेल. आम्ही सामोरं जाऊ. आम्ही कुणाला फोन करणार नाही. नशिबात काय आहे ते पाहू. मात्र महाराष्ट्रात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू आहे," अशी टीकाही त्यांनी केली. बारामती पोटनिवडणुकीमुळे राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. बारामतीत काँग्रेसने धनगर समाजाचा चेहरा म्हणून आकाश मोरे यांना उमेदवारी दिली आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भावनिक साद

# सुनेत्रा पवार गहिवरल्या; उमेदवारी अर्ज दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभेच्या जागेसाठी पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याआधी बारामतीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचा मेळावा पार पडला. मेळाव्यात बोलताना सुनेत्रा पवार यांनी बारामतीसह राज्यातील जनतेची काळजी घेण्याची शक्ती मिळावी, अशी भावनिक मागणी केली. "दोन महिन्यांपूर्वी आपण आपल्या लाडक्या नेत्याला गमावलं. आज त्या पार्श्वभूमीवर मी बारामती पोटनिवडणुकीसाठी अर्ज दाखल करत आहे. मला स्वप्नातही वाटलं नव्हतं की बारामतीची पोटनिवडणूक होईल. अजूनही दादा आपल्यात नाहीत, यावर विश्वास बसत नाही. मला हे मान्यही नाही. पण नियतीने हा काळ माझ्यावर आणि तुमच्यावर आणला आहे. दादांच्या जाण्याने फक्त माझ्या कुटुंबाचे नव्हेतर बारामती तालुक्याचे, संपूर्ण देशाचे नुकसान झाले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही," असे त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, "दादांसाठी बारामती म्हणजे आईसारखी होती. बारामतीमधील प्रत्येक नागरिक दादांसाठी खरा पांडुरंग होता. बारामतीकरांची सेवा म्हणजे पांडुरंगांची सेवा हाच दादांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांचा अखेरचा श्वासही बारामतीच्या मातीतच विसावला. बारामतीच्या प्रत्येक झाडात, फुलात, पानात, रस्त्यात, इमारतीत दादांचा स्पर्श आहे."

सुनेत्रा पवार यांनी सांगितले, "बारामतीकरांच्या विकासासाठी आदरणीय दादांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी माझं दुःख तळघरात ठेवून अत्यंत धीराने बाहेर पडले आहे. मला हा धीर तुम्हा बारामतीकरांकडे बघूनच आला आहे. तुमचं प्रेम, पाठिंबा, तुमची साथ ही माझी शक्ती आहे. गेल्या अनेक वर्षात तुम्ही सर्वांनी दादांना निवडून दिलं आहे, आणि त्यांनी प्रत्येकवेळी त्यांच्याच मताधिक्क्याचा विक्रम मोडित काढला."

सुनेत्रा पवार यांनी आपल्या सामाजिक कार्याचा अनुभव आणि पवार कुटुंबाची काळजी घेतल्याचा उल्लेख करत सांगितले, "दादांच्या नंतर ही पहिलीच निवडणूक आहे. माझ्या लग्नापूर्वीपासून सामाजिक कार्याचा वारसा लाभला असून, चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या आदरणीय पवार साहेबांची सून म्हणून आणि सहा वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजित पवारांची पत्नी म्हणून गेली ४० वर्ष पवार परिवाराची काळजी घेतली आहे. आता बारामतीसह राज्यातील जनतेचीही काळजी घेण्याची शक्ती मला मिळावी," असे आवाहन त्यांनी केले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांना इशारा

# बंगालमध्ये जंगलराज; ४ मे नंतर सर्वांचा हिशेब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कूचबिहार :** कूचबिहार येथे बंगालमधील पहिल्या प्रचारसभेला संबोधित करताना मोदी यांनी ममता बॅनर्जी सरकारवर जोरदार टीका केली. राज्याच्या भविष्यासाठी ही निवडणूक निर्णायक असून, ४ मे नंतर कायद्याचे राज्य प्रस्थापित झाल्यावर टीएमसीच्या गुंडांनी केलेल्या अत्याचारांचा चुन चुन के हिसाब होगा, असा इशारा मोदी यांनी दिला. हे सरकार दररोज बंगालच्या पवित्र भूमीवर लोकशाहीला रक्ताने माखत आहे असेही मोदी म्हणाले.

मालदामध्ये न्यायालयीन अधिकाऱ्यांना घेराव घालण्याची घटना म्हणजे, पश्चिम बंगालमधील तृणमूलच्या 'महा जंगलराज'चे लक्षण असल्याचे टीका पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी केली. विधानसभा निवडणुका सत्ताधारी पक्षाने पसरवलेल्या 'भय' आणि भाजपच्या 'भरोसा' यांच्यातील लढत असल्याचेही मोदी यांनी म्हटले आहे. मोदी म्हणाले, एका बाजूला टीएमसीचे भय आहे आणि दुसऱ्या बाजूला भाजपचा भरोसा आहे. एका बाजूला टीएमसीच्या कट मनी आणि भ्रष्टाचाराचे भय आहे, तर दुस-या बाजूला विकासाला गती देणारा भाजप आहे. एका बाजूला बदलत्या लोकसंख्येमुळे स्वतःच्या भूमीवरील स्वातंत्र्य गमावण्याची भीती आहे. दुसऱ्या बाजूला स्वतःच्या मातीत अभिमानाने आणि उंच मानेने जगण्याचा भाजपचा विश्वास आहे. भाजप घुसखोरी थांबवेल आणि घुसखोरांना बाहेर काढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दोन-तीन दिवसांपूर्वी संपूर्ण देशाने पाहिले की मालद्यात न्यायालयीन अधिका-यांना कसे ओलीस ठेवण्यात आले. हे कसले सरकार आहे? न्यायाधीश आणि घटनात्मक प्रक्रियाही सुरक्षित नाहीत, ही कसली व्यवस्था आहे? असे लोक बंगालच्या सामान्य नागरिकांची सुरक्षा कशी सुनिश्चित करू शकतात, असे ते म्हणाले.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, भाजप ठरावीक समुदायाच्या नव्हे, घुसखोरांच्या विरोधात आहे. आसाम व पश्चिम बंगालमध्ये पक्षाच्या विजयाबाबत त्यांनी पूर्ण विश्वास व्यक्त केला. गडकरी यांनी सांगितले की धर्माचा विचार न करता सर्वांना सोबत घेऊन जाणे हे भाजपचे धोरण आहे. पायाभूत सुविधांसाठी केलेली गुंतवणूक आणि प्रशासन-केंद्रित दृष्टिकोन हे भाजपच्या निवडणूक रणनीतीचे आधारस्तंभ आहेत. आसाममध्ये ९ एप्रिल रोजी विधानसभा निवडणुका होणार आहेत.

### ९ पोलिसांना मृत्यूदंडाची शिक्षा

**मदुराई :** पोलिस कोठडीत झालेल्या बेदम मारहाणीमुळे बाप-लेकाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात मदुराई जिल्हा न्यायालयाने मोठा निर्णय देत ९ पोलिस कर्मचाऱ्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात निरीक्षक श्रीधर यांच्यावर १५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींमध्ये निरीक्षक श्रीधर, उपनिरीक्षक बालाकृष्णन व रघु गणेश तसेच पोलिस कर्मचारी मुरुगन, समदुरई, मुथुराजा, चेल्लादुरई, थॉमस फ्रान्सिस आणि वोइलुमुथु यांचा समावेश आहे. बाप-लेकाला अमानुष मारहाण करण्यात आली. हा प्रकार वाचूनही अंगावर शहारे येतात, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# इराणच्या पेट्रोकेमिकल प्रकल्पावर हल्ला

### अमेरिकेच्या इशाऱ्यानंतर इस्रायलची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराणच्या दक्षिण पार्समधील पेट्रोकेमिकल प्रकल्पावर हल्ला केला आहे, अशी माहिती इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनी सोमवारी दिली. इराणने या प्रकल्पावर हल्ला झाल्याचे सांगितल्यानंतर इस्रायल कॅट्झ यांनी स्पष्ट केले की, इस्रायलने असलुयेह येथे असलेल्या इराणच्या सर्वात मोठ्या पेट्रोकेमिकल प्रकल्पावर मोठा हल्ला केला आहे. हे एक प्रमुख लक्ष्य असून, इराणच्या सुमारे ५०% पेट्रोकेमिकल उत्पादन येथे होते.

दक्षिण पार्समधील नैसर्गिक वायू क्षेत्राला लक्ष्य करण्यात आल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायल आणि त्याच्या आखाती अरब शेजारी देशांवर क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरानला होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी दिलेली अंतिम मुदत जवळ येत असताना, मध्यस्थांनी एक नवीन युद्धविराम प्रस्ताव प्रसारित केला आहे. इराण आणि अमेरिकेला रविवारी रात्री उशिरा ४५ दिवसांच्या युद्धविरामाचा आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचा प्रस्तावाचा मसुदा प्राप्त झाला, असे वृत्त माध्यमांनी दिले आहे. हा प्रस्ताव इजिप्त, पाकिस्तान आणि तुर्कीच्या मध्यस्थांकडून आला आहे, ज्यांना आशा आहे की ४५ दिवसांची मुदत कायमस्वरूपी युद्धविरामावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ देईल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी रविवारी आपला इशारा अधिक तीव्र केला आहे की, इराणच्या सरकारने मंगळवारच्या मुदतीपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडली नाही, तर तेथील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर जोरदार हल्ला चढवला जाईल. तर धमकीला निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल, असे इराणच्या उप परराष्ट्रमंत्र्यांनी स्पष्ट केले होते.

### सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली विशेष अनुमती याचिका

# राष्ट्रीय महामार्गांवरील टोल वसुलीचा केंद्राला अधिकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :**
राष्ट्रीय महामार्गांवरील टोल वसुलीबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या अधिकाराला पूर्ण मान्यता दिली आहे. टोल वसुलीला आव्हान देणारी विशेष अनुमती याचिका न्यायालयाने फेटाळून लावत, हा विषय केंद्र सरकारच्या अधिकारात येतो, असे स्पष्ट केले.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने सांगितले की, राष्ट्रीय महामार्गांवर आकारला जाणारा टोल हा संघ सूचीतील बाबींमध्ये मोडतो, त्यामुळे त्यावर फक्त केंद्र सरकारच नियंत्रण ठेवू शकते. सर्वोच्च न्यायालयाच्या मते, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) कडून घेतला जाणारा टोल हा भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची-१ (संघ सूची) मधील नोंद २३ आणि ९६ अंतर्गत येतो. याचा अर्थ, राष्ट्रीय महामार्गांवरील टोल आकारण्याचा पूर्ण अधिकार केंद्र सरकारकडे आहे. न्यायालयाने सांगितले की, राज्यांना टोल आकारण्याचा अधिकार आहे, पण तो फक्त राज्यस्तरीय रस्ते, पूल किंवा फेरी सेवांपुरता मर्यादित आहे. राष्ट्रीय महामार्गांवर राज्य सरकारांना टोल आकारण्याचा अधिकार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्णयाला कायम ठेवले. उच्च न्यायालयाने आधीच राष्ट्रीय महामार्गांवरील टोल वसुली वैध असल्याचे सांगितले होते.

याचिकाकर्त्यांने असा दावा केला होता की, राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम, २००८ मधील नियम ८ चुकीचे आहेत. टोल वसुलीचा अधिकार फक्त राज्यांकडे आहे. न्यायालयाने हे सर्व युक्तिवाद फेटाळून लावले आणि केंद्र सरकारच्या अधिकाराची पुष्टी केली.

न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग कायदा, १९५६ मधील तरतुदींचा अभ्यास केला. कलम ७, ८अ आणि ९ अंतर्गत केंद्र सरकारला टोल वसुलीचे अधिकार स्पष्ट आहेत. २००८ चे नियम आणि टोल प्लाझा ठिकाणाशी संबंधित नियम योग्य आहेत, असेही न्यायालयाने नमूद केले.

या निर्णयामुळे राष्ट्रीय महामार्गांवरील टोल वसुलीवर केंद्राचा अधिकार अबाधित राहणार आहे. राज्य सरकारांना यावर काहीही टाळेबंदी करता येणार नाही.

# शिक्षकांना उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र राज्यातील शाळांना २ मे ते १४ जून या कालावधीत उन्हाळी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. परंतु यंदा शिक्षकांना ही सुट्टी पूर्णपणे मिळणार नाही, कारण त्यांच्यावर जनगणनेची जबाबदारी टाकण्यात आली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून निवडणूक प्रक्रियेत व्यस्त असलेल्या शिक्षकांना आता साधारण १६ मे ते १४ जून दरम्यान घराघरात जाऊन माहिती गोळा करण्याचे काम करावे लागणार आहे.

शाळांमध्ये जाहीर केलेल्या सुट्ट्या आणि जनगणनेच्या कामाचा वेळ एकमेकांवर ओव्हरलॅप होत असल्यामुळे शिक्षकांना प्रत्यक्षात फक्त १२ दिवसांची वास्तविक सुट्टी मिळणार आहे. त्यानंतर १६ मेपासून जिल्हा परिषद, महापालिका आणि खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांना जनगणनेचे काम करावे लागणार आहे.

अनेक शिक्षकांनी आधीच उन्हाळी सुट्टीसाठी प्रवासाचे नियोजन केलेले आहे; काहीजण कुटुंबासोबत गावी जाण्याचा, तर काही पर्यटन स्थळी फिरण्याचा प्लॅन करत आहेत. परंतु प्रशासनाने शिक्षकांना मुख्यालय सोडू नये असे आदेश दिल्यामुळे सुट्टीचा आनंद घेणे कठीण होणार आहे. यामुळे शिक्षकांवर कामाचा ताण वाढणार आहे, कारण विद्यार्थ्यांना सुट्टी असली तरी शिक्षकांना घराघरात जाऊन माहिती जमा करण्यास भाग पाडले जाणार आहे. संपूर्ण परिस्थिती पाहता, राज्यातील शिक्षकांना उन्हाळी सुट्टीचा पूर्ण लाभ घेता येणार नाही, तर त्यांना जनगणनेचे काम करावे लागणार आहे.

## संपादकीय

# दर स्थिरतेमागचे अस्थिर वास्तव



**रिझर्व्ह बँकेने व्याजदर स्थिर ठेवण्याचा निर्णय हा वरकरणी साधा वाटू शकतो. परंतु अर्थकारणात स्थिरता ही अनेकदा अनिश्चिततेचीच खूण असते. दर न बदलणे म्हणजे सर्व काही ठीक आहे असे नसते; उलट परिस्थिती गुंतागुंतीची आहे याचेच ते लक्षण असते.**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे पतधोरण जाहीर झाले की सर्वसाधारणपणे लक्ष एकाच गोष्टीवर केंद्रित होते, रेपो दर वाढला की कमी झाला. पण प्रत्यक्षात पतधोरणाचा अर्थ केवळ व्याजदर नसतो; तो अर्थव्यवस्थेच्या दिशेबद्दलचा संकेत असतो. केंद्रीय बँक अनेकदा शब्दांत कमी आणि संकेतांत जास्त बोलत असते. त्यामुळे दर स्थिर ठेवण्याचा निर्णय हा निष्क्रियतेचा नसून सावध भूमिकेचा असतो. गेल्या काही वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था तुलनेने स्थिर गतीने वाढत होती. महामारीनंतरची पुनर्प्राप्ती, सरकारी पायाभूत गुंतवणूक, सेवा क्षेत्रातील वाढ आणि बँकिंग क्षेत्रातील सुधारणा यामुळे अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात स्थैर्य मिळाले. महागाईही नियंत्रणाच्या मर्यादेत राहिली. त्यामुळे व्याजदरात कपात करून वाढीस चालना देण्याचा प्रयत्न झाला. पण अर्थकारणात परिस्थिती कायम एकसारखी राहत नाही. आज परिस्थिती वेगळी आहे. जगभरातील अर्थव्यवस्थांवर अनिश्चिततेचे सावट आहे. ऊर्जा किमती, भूराजकीय तणाव, जागतिक व्यापारातील मंदी, चलनातील चढउतार या सर्व गोष्टींचा परिणाम भारतावर होत आहे. भारत मोठ्या प्रमाणात तेल आयात करतो. तेल महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो, उत्पादन खर्च वाढतो आणि शेवटी महागाई वाढते. महागाई वाढली की केंद्रीय बँकेला व्याजदर वाढवण्याचा दबाव येतो. म्हणजे तेलाच्या किमती आणि व्याजदर यांचा संबंध अप्रत्यक्ष असला तरी महत्त्वाचा असतो. दुसरीकडे विकासाचा वेग कायम ठेवण्याची गरज आहे. उद्योगांना स्वस्त कर्ज हवे असते, घरखरेदीसाठी कर्ज घेणाऱ्यांना कमी व्याजदर हवेत, बाजाराला तरलता हवी असते. व्याजदर वाढले तर कर्ज महाग होते आणि गुंतवणूक कमी होऊ शकते. म्हणजेच व्याजदर वाढवले तर महागाई नियंत्रणात येऊ शकते, पण विकास मंदावण्याचा धोका असतो. व्याजदर कमी ठेवले तर विकासाला चालना मिळते, पण महागाई वाढू शकते. हीच केंद्रीय बँकेसमोरची खरी कसरत असते. अर्थशास्त्रात याला संतुलनाचे धोरण असे म्हणतात. भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रुपयाचे मूल्य. जागतिक बाजारात डॉलर मजबूत झाला तर रुपयावर दबाव येतो. रुपया कमजोर झाला तर आयात महाग होते आणि महागाई वाढू शकते. त्यामुळे व्याजदर धोरणाचा संबंध चलनाशीही असतो. व्याजदर जास्त असले तर परदेशी गुंतवणूक येऊ शकते आणि चलन स्थिर राहू शकते. म्हणजे व्याजदर हा केवळ कर्जाचा प्रश्न नसून चलन आणि गुंतवणुकीचाही प्रश्न आहे. यामुळे पतधोरणाचा निर्णय हा अनेक घटकांचा ताळमेळ असतो. महागाई, विकास, चलन, जागतिक अर्थव्यवस्था, गुंतवणूक, बँकिंग क्षेत्र, सरकारी कर्ज या सर्व गोष्टींचा विचार करून निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे रेपो दरात अर्धा टक्का वाढ किंवा कपात ही वरकरणी छोटी गोष्ट वाटली, तरी तिचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. सध्याच्या परिस्थितीत केंद्रीय बँक सावध भूमिका घेत आहे, असे दिसते. कारण जागतिक अर्थव्यवस्था अजून पूर्णपणे स्थिर झालेली नाही. अनेक देश अजूनही महागाईशी झुंज देत आहेत, काही देश मंदीच्या भीतीत आहेत आणि काही देशांमध्ये राजकीय अस्थिरता आहे. अशा वेळी घाईघाईने व्याजदर बदलणे धोकादायक ठरू शकते. अर्थकारणात एक महत्त्वाचा नियम आहे, चुकीचा निर्णय दुरुस्त करता येतो, पण चुकीच्या वेळी घेतलेला निर्णय दुरुस्त करणे कठीण असते. त्यामुळे केंद्रीय बँका अनेकदा घाई करत नाहीत. त्या परिस्थिती स्पष्ट होईपर्यंत थांबतात. ही थांबण्याची भूमिका अनेकदा निष्क्रियता वाटते; पण प्रत्यक्षात ती सावधगिरी असते. भारतीय अर्थव्यवस्थेची पुढील वाटचाल मोठ्या प्रमाणात जागतिक परिस्थितीवर अवलंबून असणार आहे. निर्यात, ऊर्जा, परकीय गुंतवणूक, चलन यावर बाह्य घटकांचा प्रभाव राहणार आहे. त्यामुळे पतधोरण अधिक सावध आणि संतुलित राहण्याची शक्यता आहे. दर झपाट्याने वाढले तर अर्थव्यवस्था अडचणीत असल्याचा संकेत, दर झपाट्याने कमी झाले तर वाढीस चालना देण्याची गरज असल्याचा संकेत आणि दर स्थिर राहिले तर परिस्थिती अनिश्चित असल्याचा संकेत मिळतो. महागाई नियंत्रणात आहे, पण दबावही आहे. अशा वेळी वेगाने निर्णय घेण्यापेक्षा संतुलन राखणे अधिक महत्त्वाचे ठरते. अर्थव्यवस्था धावत असताना ब्रेक लावणे सोपे असते; पण वळणावर वेग नियंत्रणात ठेवणे अधिक कठीण असते. सध्या रिझर्व्ह बँक नेमके तेच करताना दिसते.

# मध्यपूर्वेतील भूमीवर अमेरिकेचा जुगार

जागतिक राजकारणात काही संघर्ष असे असतात की ज्यात विजय कोणाचाच होत नाही, पण पराभव अनेकांचा होतो. अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष तसाच आहे. हा संघर्ष केवळ दोन देशांमधला नाही; तो तेल, व्यापारमार्ग, इस्रायल, अरब राष्ट्रे, चीन, रशिया आणि जागतिक अर्थव्यवस्था या सर्वांशी जोडलेला आहे. त्यामुळे हा संघर्ष प्रादेशिक असला तरी त्याचे परिणाम जागतिक आहेत.

या संघर्षाची सुरुवात नेहमीप्रमाणे सुरक्षा आणि अण्वस्त्रांच्या प्रश्नापासून झाली. अमेरिकेचा दावा असा की इराण अण्वस्त्र कार्यक्रम पुढे नेत आहे आणि त्याला थांबवणे आवश्यक आहे. इराणचा दावा असा की अमेरिका आणि इस्रायल हा संघर्ष राजकीय कारणांसाठी वाढवत आहेत. या परस्पर संशयातून संघर्ष वाढत गेला आणि अखेर तो उघड युद्धात बदलला.

अमेरिकेची या संघर्षातील भूमिका समजून घेण्यासाठी तिचे दीर्घकालीन धोरण समजून घ्यावे लागते. अमेरिकेचे उद्दिष्ट केवळ इराणला रोखणे नाही; तर संपूर्ण



पश्चिम आशियातील शक्ती संतुलन आपल्या बाजूने ठेवणे हे आहे. तेलमार्ग, समुद्री मार्ग, इस्रायलची सुरक्षा आणि अरब देशांवरील प्रभाव हे अमेरिकेच्या धोरणाचे प्रमुख घटक आहेत. त्यामुळे इराण मजबूत होणे अमेरिकेला परवडणारे नाही. पण इराणच्याही बाजूने हा संघर्ष केवळ संरक्षणाचा नाही; तो अस्तित्वाचा प्रश्न आहे. इराणला वाटते की अमेरिकेचा अंतिम उद्देश त्यांची राजवट कमकुवत करणे किंवा बदलणे हा आहे. त्यामुळे इराण या संघर्षाकडे लष्करी संघर्ष म्हणून नाही, तर अस्तित्वाच्या संघर्ष म्हणून पाहतो. या संघर्षात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दोन्ही देशांचा चुकीचा अंदाज. अमेरिकेला वाटते की आर्थिक निर्बंध, लष्करी दबाव आणि राजनैतिक एकाकीकरण यामुळे इराण कमकुवत होईल आणि शेवटी तडजोड करेल. पण अनेक दशकांच्या अनुभवातून इराणने निर्बंधांशी जगण्याची सवय केली आहे. उलट निर्बंधांमुळे इराण अधिक बंद आणि अधिक राष्ट्रवादी झाला आहे.

इराणचा अंदाज वेगळा आहे. इराणला वाटते की अमेरिकेला दीर्घकालीन युद्ध परवडत नाही. अमेरिकन समाज युद्धाला कंटाळतो, आर्थिक खर्च वाढतो आणि शेवटी अमेरिका माघार घेते. व्हिएतनाम, इराक आणि अफगाणिस्तान या युद्धांचा इतिहास पाहता हा अंदाज पूर्णपणे चुकीचा नाही. त्यामुळे इराण दीर्घकालीन संघर्षाची तयारी ठेवतो.

या दोन्ही अंदाजांच्या मध्ये अडकलेला आहे तो संपूर्ण पश्चिम आशिया. तेलवाहतूक, समुद्री व्यापार, ऊर्जा बाजार, अरब देशांची सुरक्षा आणि जागतिक अर्थव्यवस्था या सर्वांवर या संघर्षाचा परिणाम होत आहे. विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. जगातील मोठ्या प्रमाणावर तेल या मार्गाने जाते. हा मार्ग बंद झाला तर जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. यामुळे हा संघर्ष सरळ युद्ध राहिलेला नाही; तो दबाव आणि प्रतिदबाव यांचा खेळ झाला आहे. अमेरिकेचा दबाव, इराणचा प्रतिकार, अरब देशांची भीती, इस्रायलची भूमिका, चीन आणि रशियाची रणनीती - या सर्वांचा एक गुंतागुंतीचा खेळ सुरू आहे.

इतिहासात अनेकदा असे झाले आहे की युद्धे जिंकण्यापेक्षा युद्ध टाळणे अधिक शहाणपणाचे ठरते. कारण युद्धाचा शेवट कधीच पूर्ण विजयात होत नाही; तो तडजोडीतच होतो. प्रश्न इतकाच असतो की तडजोड आधी होते की युद्धानंतर होते. युद्धानंतर झालेली तडजोड अधिक महाग असते. अमेरिका आणि इराण या

**» आंतरराष्ट्रीय राजकारणात युद्धे अनेकदा विचारपूर्वक सुरू होत नाहीत, ती चुकीच्या अंदाजातून सुरू होतात. अमेरिकेला वाटते की दबावाने इराण माघार घेईल आणि इराणला वाटते की प्रतिकाराने अमेरिका थकेल.**

दोन्ही देशांसाठीही हेच लागू होते. अमेरिका इराण पूर्णपणे नष्ट करू शकत नाही आणि इराण अमेरिकेला पश्चिम आशियातून पूर्णपणे बाहेर काढू शकत नाही. म्हणजे शेवटी दोघांनाही तडजोड करावी लागणार आहे. पण तोपर्यंत संघर्ष सुरू राहू शकतो. या संपूर्ण संघर्षात एक गोष्ट लक्षात ठेवावी लागते. आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय नेहमी तर्कावर घेतले जात नाहीत; ते अनेकदा प्रतिष्ठा, राजकीय दबाव, देशांतर्गत राजकारण आणि नेतृत्वाच्या प्रतिमेवर घेतले जातात. त्यामुळे अनेक युद्धे जिंकण्यासाठी नाही, तर कमकुवत दिसू नये म्हणून लढली जातात. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षही तसाच आहे. दोघांनाही माघार घ्यायची नाही, कारण माघार म्हणजे पराभव असे समजले जाते. त्यामुळे संघर्ष चालू राहतो. हा संघर्ष कोण जिंकणार हा प्रश्न महत्त्वाचा नाही. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की या संघर्षात सर्वात जास्त नुकसान कोणाचे होणार. आणि त्याचे उत्तर आहे - संपूर्ण प्रदेशाचे, जागतिक अर्थव्यवस्थेचे आणि सामान्य लोकांचे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात सर्वात धोकादायक गोष्ट शत्रू नसते; चुकीचा अंदाज असतो. कारण शत्रू दिसतो, पण चुकीचा अंदाज दिसत नाही. अमेरिका आणि इराण या दोघांनीही एकमेकांविषयी काही अंदाज बांधले आहेत. जर हे अंदाज चुकीचे ठरले, तर या संघर्षाची किंमत संपूर्ण जगाला मोजावी लागू शकते. म्हणूनच हा संघर्ष दोन देशांचा नसून दोन अंदाजांचा जुगार आहे. आणि इतिहास सांगतो की आंतरराष्ट्रीय राजकारणात जुगार अनेकदा महागात पडतो.

# मेट्रो प्रकल्पासोबत पर्यावरण संवर्धनही

## १,३०५ झाडांच्या बदल्यात ५,५०० झाडांची लागवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** हिंजवडी आयटी पार्कला जोडणारा 'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्ग-३' प्रकल्प अंतिम टप्प्यात आला असून, या प्रकल्पासोबत पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देण्यात आले आहे. प्रकल्पामुळे बाधित झालेल्या १ हजार ३०५ झाडांच्या बदल्यात तब्बल ५ हजार ५०० नवीन झाडांची लागवड करण्यात आली असून, नव्याने लावलेल्या झाडांचे जगण्याचे प्रमाण १०० टक्के असल्याची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांनी दिली.



मेट्रो मार्गावरील खांब, स्थानके आणि जिने उभारण्याच्या कामामुळे मार्गावरील अनेक ठिकाणची झाडे बाधित झाली होती. पर्यावरणपूरक भूमिका घेत पीएमआरडीएने यापैकी केवळ ५५७ झाडे तोडली, तर ७४८ झाडांचे सुरक्षितरीत्या पुनर्रोपण करण्यात आले. पर्यावरणाची हानी भरून काढण्यासाठी ५ हजार ५०० नवीन झाडे लावण्याचा निर्णय घेण्यात आला. ही झाडे शहरातील विविध ठिकाणी लावण्यात आली असून त्यामध्ये ताथवडे येथील कास्टिंग यार्ड, बावधन येथील एनडीए वनक्षेत्र, एनसीएल परिसर, पंचवटी, हिंजवडी फेज-३ मधील एमआयडीसी प्लॉट, राजभवन परिसर तसेच कृषी महाविद्यालय परिसराचा समावेश आहे.

वृक्षारोपण मोहिमेत तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला आहे. सर्व झाडांचे जिओटॅगिंग करण्यात आले असून प्रत्येक झाडावर क्यूआर कोड लावण्यात आला आहे. नागरिकांनी मोबाईलवरून क्यूआर कोड स्कॅन केल्यास संबंधित झाडाचे नाव, प्रजाती आणि पर्यावरणातील महत्त्वाची माहिती उपलब्ध होते. यासाठी सर्व झाडांचा स्वतंत्र डेटाबेस तयार करण्यात आला आहे.

नव्याने लागवड केलेल्या सर्व ५ हजार ५०० झाडांनी मूळ धरले असून त्यांचे जगण्याचे प्रमाण १०० टक्के आहे. पुनर्रोपण केलेल्या झाडांचे जगण्याचे प्रमाण सुमारे ८० टक्के आहे. हिंजवडी फेज-२ मधील वनक्षेत्रात सर्वाधिक म्हणजे सुमारे ३ हजार झाडांचे पुनर्रोपण करण्यात आले होते. या झाडांना आता फुले आणि फळे येण्यास सुरुवात झाली आहे. मेट्रो प्रकल्पामुळे पायाभूत सुविधा विकास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याचे पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी सांगितले.

# पिंपरीत भाज्यांचे दर घसरले, मागणी कमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आखाती देशांमधील गॅसटंचाईचा परिणाम स्थानिक बाजारपेठेवरही दिसू लागला असून, हॉटेल व्यावसायिकांकडून भाज्यांची खरेदी कमी झाल्याने पिंपरीतील लालबहादूर शास्त्री मंडई येथे भाज्यांचे दर काही प्रमाणात घसरले आहेत. टोमॅटो, काकडी आणि कोबीची आवक वाढल्याने बाजारात दरात घट झाली आहे.

सध्या काकडी ४० रुपयांवरून २० रुपये किलोने विकली जात आहे. शेवग्याचे दर ८० वरून ४० रुपये झाले आहेत. टोमॅटो ४० रुपयांवरून २० ते २५ रुपये किलो, तर मिरची १०० रुपयांवरून ७० रुपये प्रतिकिलोने विक्री होत आहे. उन्हाळ्यामुळे लिंबाला मागणी वाढलेली आहे. मोशी येथील उपबाजारात फळभाज्यांची आवक गत आठवड्यापेक्षा कमी नोंदवली गेली. बाजारात ४ हजार २९१ क्विंटल फळभाज्या, ५३ हजार ४०० गड्या पालेभाज्या आणि २ हजार १९ क्विंटल फळांची आवक झाली.

पिंपरी बाजारपेठेत अनेक छोटे विक्रेते मंडईतून भाजी खरेदी करून उपनगरात विक्री करतात. हे विक्रेते परिसरातील हॉटेल आणि खानावळींना भाज्या पुरवतात. मात्र, काही खानावळी बंद असल्याने आणि हॉटेलकडून मागणी कमी झाल्याने छोट्या विक्रेत्यांच्या ऑर्डरमध्येही घट झाली आहे. त्यामुळे मागणी कमी होऊन दर घसरल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# बारामती पोटनिवडणुकीतून लक्ष्मण हाके यांची माघार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची राजकीय घडामोड घडली आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी काही वेळ शिल्लक असतानाच ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याची घोषणा केली.

बारामती पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच महायुतीतील नेत्यांकडून प्रयत्न सुरू होते. यासाठी काँग्रेस आणि लक्ष्मण हाके यांच्याशी संपर्क साधण्यात आला होता. मात्र, काँग्रेसने ॲड. आकाश मोरे यांना उमेदवारी जाहीर केल्याने निवडणूक होणार हे स्पष्ट झाले होते.

लक्ष्मण हाके यांनी निवडणूक लढवण्याची आक्रमक भूमिका घेतली होती. मात्र, उमेदवारी अर्ज भरण्याच्या काही वेळ आधी दत्तात्रय भरणे यांनी हाके यांची भेट घेऊन निवडणूक अर्ज मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली आणि हाके यांनी माघार जाहीर केली. लक्ष्मण हाके म्हणाले की, बारामतीमध्ये सहानुभूतीची मोठी लाट आहे. सुनेत्रा पवार, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यातील वरिष्ठ नेत्यांनी माघार घेण्यासाठी विनंती केल्यानंतर निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्याचे हाके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# पीडीसीसी बँकेतील ९ दिग्गजांना नियमाचा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** सहकार क्षेत्रात मोठा बदल करणारा महत्त्वाचा निर्णय सहकार मंत्रालयाने घेतला असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी संचालक राहिलेल्या व्यक्तींना पुढील निवडणूक लढवता येणार नाही. या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (पीडीसीसी) बँकेच्या विद्यमान ९ संचालकांना सक्तीची विश्रांती घ्यावी लागणार आहे.

बँकिंग सुधारणा अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी सहकार मंत्रालयाने ९ मार्च रोजी सहकार आयुक्तालयाला पत्र पाठवले आहे. त्यानुसार १० वर्षांपेक्षा अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तींना




पुढील निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यात येणार आहे. सहकार क्षेत्रातील एकाधिकारशाही कमी करून बँकिंग व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

या निर्णयाचा सर्वाधिक फटका पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अनेक दिग्गज संचालकांना बसणार आहे. बँकेचे विद्यमान अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुगाडे यांच्यासह दिलीप वळसे-पाटील, दत्तात्रय भरणे, रमेश थोरात, संग्राम थोपटे, दिलीप मोहिते-पाटील, रेवणनाथ दारवटकर, ॲड. संजय काळे आणि आप्पासाहेब जगदाळे यांचा समावेश आहे. पीडीसीसी बँकेच्या विद्यमान २१ संचालकांपैकी तब्बल ९ संचालक या नव्या नियमामुळे अपात्र ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हा नियम केवळ पुणे जिल्ह्यापुरता मर्यादित नसून राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना लागू होणार आहे. त्यामुळे राज्यातील सहकार राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता असून अनेक ठिकाणी नवीन चेहरे आणि नवीन नेतृत्व पुढे येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगामी निवडणुकांमध्ये विद्यमान नेते आपल्या वारसदारांना संधी देणार की नवीन नेतृत्व पुढे आणणार, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## राज्यात प्राध्यापक, ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक भरतीला मंजुरी

# विद्यापीठे तसेच संलग्न महाविद्यालयात मेगा भरती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यातील विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमधील रिक्त शैक्षणिक पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला असून, राज्य शासनाने सहाय्यक प्राध्यापकांसह ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक पदांच्या भरतीस मंजुरी दिली आहे. या संदर्भातील परिपत्रक पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय यांनी जारी केले असून, त्यामुळे महाविद्यालयांमध्ये लवकरच भरती प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.




राज्य शासनाने उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त पदांच्या भरतीस मान्यता दिली आहे. राज्यभरातील सुमारे ५५०० हून अधिक सहाय्यक प्राध्यापक पदे भरली जाणार आहेत.

ही पदभरती १ ऑक्टोबर २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विद्यार्थी संख्येच्या आधारे करण्यात येणार आहे. त्यानुसार विषयवार पदांचा तपशील संबंधित महाविद्यालयांना कळवण्यात आला आहे.

या भरती प्रक्रियेमुळे अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या प्राध्यापक पदांचा प्रश्न मार्गी लागणार असून, महाविद्यालयांतील अध्यापनावर होणारा ताण कमी होण्याची शक्यता आहे. अनेक महाविद्यालयांमध्ये तासिका तत्वावर शिक्षक नेमून काम चालवले जात होते. नियमित प्राध्यापक भरती झाल्यानंतर शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सहाय्यक प्राध्यापक पदांसोबतच ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक पदांची भरतीही मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे या तिन्ही संवर्गांची एकत्रित बिंदूनामावली (रोस्टर) तपासणी करावी लागणार आहे. आरक्षण निश्चित करताना मागासवर्ग कक्षाकडून रिक्त पदांचे आरक्षण आणि प्रत्यक्ष भरावयाच्या पदांचे आरक्षण वेगवेगळे निश्चित केले जाते. त्यामुळे महाविद्यालयांना रोस्टर तपासणीची प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या शासन निर्णयांचे पालन करणे संबंधित शिक्षण संस्थांसाठी आवश्यक असणार आहे. रोस्टर तपासणी पूर्ण झाल्यानंतरच प्रत्यक्ष भरती प्रक्रिया सुरू होणार आहे.

दरम्यान, पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाने पुणे, अहमदनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतील ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक पदांची माहिती जाहीर केली आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील महाविद्यालयांमध्येही भरती प्रक्रिया वेग घेणार आहे.

या निर्णयामुळे राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला असून, प्राध्यापक होण्याची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली प्राध्यापक भरती आता प्रत्यक्षात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# पुण्यातील तापमानात पुन्हा वाढीची नोंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** अवकाळी पावसाने विश्रांती घेतल्यानंतर शहरासह जिल्ह्यातील कमाल तापमानात पुन्हा वाढ होऊ लागली आहे. रविवारी (दि. ५) लोहगाव येथे सर्वाधिक ३६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. पुढील दोन ते तीन दिवस आकाश सामान्यत: निरभ्र राहणार असून दुपारनंतर काही प्रमाणात ढगाळ वातावरण राहील, असा अंदाज पुणे वेधशाळा यांनी वर्तवला आहे. अवकाळी पावसामुळे मागील आठ दिवसांपासून शहरासह उपनगरात उन्हाचा चटका कमी झाला होता आणि वातावरणात गारवा वाढला होता. मात्र, मागील दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने तापमानात वाढ होऊ लागली आहे.

३२ अंशापर्यंत खाली आलेले कमाल तापमान आता ३६ अंशांच्या पुढे गेले आहे. रविवारी लोहगाव येथे ३६.१ अंश, शिवाजीनगर येथे ३३.७ अंश, तर चिंचवड आणि एनडीए परिसरात ३२.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

दिवसभर उकाडा जाणवत असला तरी रात्री आणि पहाटेच्या गारव्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळत आहे. मात्र, पुढील आठवड्यात कमाल तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून उन्हाचा चटका पुन्हा वाढणार असल्याचा अंदाज वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### विवाहितेचा छळ, १२ जणांविरुद्ध गुन्हा

**फुरसुंगी :** फुरसुंगी परिसरात एका विवाहित महिलेला पती व सासरच्या मंडळींकडून झालेल्या अमानुष छळाचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, सतत मानसिक व शारीरिक त्रास देत अखेर पतीने जबरदस्तीने गर्भपात केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाणे येथे १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी ३६ वर्षीय विवाहितेने फिर्याद दिली आहे. त्यानुसार लग्नानंतर पती व सासरच्या मंडळींकडून तिला विविध कारणांवरून वारंवार मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. घरगुती कारणांवरून मारहाण, शिवीगाळ तसेच छळ करण्यात येत होता. या छळाला कंटाळूनही तिने संसार टिकवण्याचा प्रयत्न केला; मात्र त्रास वाढतच गेला. दरम्यान, ती गर्भवती असताना पतीने जबरदस्तीने गर्भपात केल्याचा आरोप फिर्यादी महिलेने केला आहे.

### बाजारतळावरील चार वाहने जळून खाक

**लोणी काळभोर :** लोणी काळभोर पोलीस ठाणे हद्दीत विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेली वाहने बाजारतळावर उभी असताना सोमवारी दुपारी अचानक आग लागून चार वाहने जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, बाजारतळ परिसरात उभी असलेली काही वाहने अचानक पेट घेत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते विशाल वेदपाठक यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना याबाबत माहिती दिली. माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक दल, ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्तरीत्या प्रयत्न केले. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र तोपर्यंत चारही वाहने पूर्णतः जळून खाक झाली होती.

---

परिसराला यात्रेचे स्वरुप; मंदिर परिसराला आकर्षक सजावट

# श्री क्षेत्र लेण्याद्री येथे भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरिजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थी आणि रविवारची सुट्टी असल्यामुळे दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. त्यामुळे श्री क्षेत्र लेण्याद्री परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने पहाटे ६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे व विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभर विविध धार्मिक विधी आयोजित करण्यात आले होते. देवाच्या नैवेद्यासाठी जुन्नर येथील स्मिता प्रकाशसिंह हजारी व विक्रमसिंह प्रकाशसिंह हजारी यांनी केळी प्रसाद दिला. तसेच भाविकांसाठी देवस्थान ट्रस्टमार्फत विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे यासाठी गर्दीचे नियोजनही करण्यात आले होते. या वेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त प्रभाकर जाधव, मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी, ग्रामस्थ तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले, तर रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. यानंतर नवी मुंबई येथील कै. अनुसया विठ्ठल लोखंडे यांच्या स्मरणार्थ सुमन गोपीनाथ लोखंडे व प्रियंका विशाल लोखंडे यांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अन्नदानासाठी देवस्थानचे उपाध्यक्ष गोविंद यशवंत मेहेर यांनी ५००१ रुपयांची देणगी दिली. संकष्टी चतुर्थीनिमित्त पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक व जुन्नर परिसरातून मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

---

## 'आंबेगाव भूषण' पुरस्कारांचे वितरण १४ एप्रिलला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** युगप्रवर्तक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिले जाणारे 'आंबेगाव भूषण' राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील अहिल्यादेवी होळकर चौकात सायंकाळी ७ वाजता पार पडणार आहे. या सोहळ्यात महाराष्ट्राचे गृहमंत्री तथा आंबेगाव-शिरूर मतदारसंघाचे आमदार दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील व जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष गौतमराव खरात यांनी दिली.

या निमित्ताने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी १० वाजता पूजन, सायंकाळी ४ ते ६ या वेळेत भव्य मिरवणूक, तर रात्री ७ वाजता भीमगीतांचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर सत्कार समारंभ व पुरस्कार वितरण सोहळा पार पडेल. या कार्यक्रमात आंबेगाव तालुक्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान केला जाणार आहे. प्रियांका हांडे, नीलमताई इचके आणि ज्योतीताई गोरडे यांना विविध महिला व उद्योजकता पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे, तर 'आंबेगाव भूषण' पुरस्कारासाठी बी. जी. शेखर पाटील, प्रकाश सोनवणे, डॉ. सदानंद राऊत, शंकरराव बारवे, राजू हिंगे, अविनाश पवार, सोनाली भवारी, लक्ष्मण काळे, विजय जंगले, प्राजक्ता रोडे पाटील, कैलास गायकवाड, पूर्वाताई वाघ, जालिंदर शेवाळे, संगीताताई दांगट, सिद्धेश पिंगळे, नितीन साळवे, ॲड. साधनाताई बाजारे आणि कल्पनाताई एरंडे यांचा समावेश आहे.

---

# घोड नदीवरील पुलाचे कठडे तुटले



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील अष्टविनायक महामार्गालगत पारगाव गावाजवळील घोड नदीवरील पुलाची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. पुलाच्या एका बाजूचे कठडे तुटल्याने येथील वाहतूक धोकादायक बनली असून मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

या पुलाच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिक आणि जनप्रतिनिधींकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला जात आहे. मात्र अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. मागील काही महिन्यांत येथे घडलेल्या अपघातांमुळे परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. गेल्या महिन्यात भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या गाळप हंगामादरम्यान ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर कठडे नसल्याने थेट नदीपात्रात कोसळला होता. चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली. त्याआधी एक स्कॉर्पिओ वाहनही पुलावरून घसरून नदीत पडल्याची घटना घडली होती. या सर्व घटनांमुळे पुलावरील संरक्षण कठड्यांची गरज अधोरेखित झाली आहे.

पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे आणि ग्रामपंचायत सदस्य काळुराम लोखंडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कठडे बसवून पुलाची दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे. "वाहतूक वाढत असताना पुलावरील कठडे तुटलेले असणे अत्यंत धोकादायक आहे. मोठा अपघात टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना आवश्यक आहेत," असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, रोजंदारी कामगार आणि ऊस वाहतूक करणारी वाहने या पुलाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. कठडे नसल्याने विशेषतः रात्री, पावसाळ्यात किंवा वाहन घसरल्यास थेट नदीपात्रात पडण्याचा धोका वाढला आहे.

---

# आळंदीत पाणदरवाजाचे लोकार्पण

वेदमंत्र जयघोष आणि हरिनाम गजरात सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे इंद्रायणी नदीकडील बाजूने माऊली मंदिरात प्रवेश करण्यासाठी असलेल्या पुरातन पाणदरवाजाची दुरुस्ती आवश्यक असल्याने नवीन पाणदरवाजा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नव्याने तयार करण्यात आलेल्या नक्षीकामयुक्त भव्य लाकडी पाणदरवाजाचे लोकार्पण श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या मार्गदर्शनाखाली श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळ आळंदी यांच्या समन्वयातून उत्साहात करण्यात आले. वेदमंत्र जयघोष आणि हरिनाम गजरात विधिवत सागवानी लाकडाच्या भव्य पाणदरवाजाचे लोकार्पण करण्यात आले.

माऊली मंदिराच्या पश्चिम बाजूस वैभवी दगडी बांधकाम असून येथे पूर्वी पुरातन पाणदरवाजा होता. तो आता अस्सल सागवान लाकडाचा वापर करून नव्याने तयार करण्यात आला असून त्यावर आकर्षक कोरीव नक्षीकाम करण्यात आले आहे. हे काम श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत परिश्रमपूर्वक पूर्ण करण्यात आले. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या मार्गदर्शन व परवानगीने हा पाणदरवाजा विकसित करून सुतार समाजाने सेवा कार्य केले आहे.

या लोकार्पण प्रसंगी संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, राजाभाऊ चौधरी, शंकर महाराज पांचाळ, मंडळाचे अध्यक्ष रेणुकादास महाराज पांचाळ, आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, माजी नगराध्यक्षा वैजयंता उमरगेकर, बबनराव कुऱ्हाडे, माजी विरोधी पक्ष गटनेते डी. डी. भोसले पाटील यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी संस्थानतर्फे समाज बांधवांचा श्रींची प्रतिमा भेट देऊन सन्मान करण्यात आला. सुमारे साडेसहा लाख रुपये खर्च करून विकसित करण्यात आलेल्या या लक्षवेधी पाणदरवाजामुळे आळंदी मंदिराच्या वैभवात भर पडली असून या सेवा कार्याचे आळंदीत सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# तीन एकर कलिंगडाची बाग उध्वस्त



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लाखणगाव (ता. आंबेगाव) येथील शेतकरी विश्वनाथ रोडे यांची तीन एकरांवरील कलिंगडाची बाग अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. काढणीसाठी तयार झालेली फळे सडल्याने तसेच वेली जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

ही कलिंगडाची बाग नुकतीच तोडणीसाठी तयार झाली होती. मात्र, अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या तडाख्यामुळे संपूर्ण बाग उद्ध्वस्त झाली. या घटनेत विश्वनाथ रोडे यांचे अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. आधीच बाजारभाव घसरलेले असताना त्यातच अवकाळी पावसामुळे शेतकरी अधिकच आर्थिक संकटात सापडला आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरातील अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत. डोळ्यादेखत तयार झालेला शेतीमाल अस्मानी संकटामुळे नष्ट झाला असून कष्टाने फुलवलेल्या पिकांची नासधूस झाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

दरम्यान, लाखणगाव येथीलच शेतकरी शिवाजी रोडे यांनी एक एकर क्षेत्रात पपईची लागवड केली होती. पपई तोडणीसाठी तयार असतानाच अवकाळी पाऊस व गारपिटीचा फटका बसून त्यांची पपईची बागही मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाली आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

---

## खेड तालुक्यात आमदार हेल्पलाईन

**राजगुरुनगर :** खेड-आकंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी रामचंद काळे यांनी तालुक्यातील नागरिकांच्या समस्या थेट सोडवण्यासाठी "आमदार हेल्पलाईन" हा नवा उपक्रम सुरू केला आहे. या हेल्पलाईनद्वारे नागरिकांना आपल्या तक्रारी, अडचणी, विकासकामांबाबत सूचना तसेच परिसरातील गैरप्रकारांची माहिती थेट आमदारांपर्यंत पोहोचवता येणार आहे.

आमदार काळे यांनी सांगितले की, शहरांपासून ते दुर्गम आदिवासी पाड्यांपर्यंत प्रत्येक नागरिकाचे प्रश्न समजून घेण्याचा आणि त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून या कामांना अधिक वेग आणि प्रभावीपणा देण्यासाठी तसेच जनतेशी थेट संपर्क ठेवण्यासाठी 'आमदार हेल्पलाईन' सुरू करण्यात आली आहे.

---

# श्री ज्योतिबा यात्रेत २०० मल्लांचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** श्री ज्योतिबा मंदिर सपकळवाडी येथील श्री ज्योतिबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्तीच्या आखाड्यात सुमारे २०० मल्लांनी सहभाग घेत कुस्ती शौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. सपकळवाडी (ता. इंदापूर) येथे श्री ज्योतिबा देवाचा यात्रा उत्सव २ एप्रिल ते ४ एप्रिल दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडला. यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात्रा उत्सव समितीने कार्यक्रमांचे योग्य नियोजन केल्याने यात्रा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी झाली.

यात्रेच्या पहिल्या दिवशी २ एप्रिल रोजी पहाटे पाच वाजता श्री ज्योतिबा देवाला अभिषेक करण्यात आला. सकाळी सहा वाजता हनुमान जयंतीनिमित्त हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. सकाळी नऊ वाजता देवाच्या सासनकाठीची मिरवणूक काढण्यात आली. गुलालाची उधळण करत भाविकांनी मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यानंतर देवाच्या सासनकाठीचे आगमन होऊन नैवेद्य नारळाला सुरुवात झाली. सायंकाळी सहा ते आठ या वेळेत देवाचा गोंधळ व आरती करण्यात आली. रात्री आठ वाजता पालखीतून देवाचा छबिना काढण्यात आला. बॅन्जो पार्टी व हलगी पथक हे छबिण्याचे विशेष आकर्षण ठरले.

३ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. या कुस्ती आखाड्यात पंचक्रोशीतील सुमारे २०० मल्लांनी सहभाग घेतला. यात्रा उत्सव समितीच्या वतीने विजयी मल्लांना बक्षिसे देण्यात आली. कुस्ती क्षेत्राकडे लहान मुले व युवकांनी आकर्षित व्हावे तसेच मल्लांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने मोठ्या प्रमाणात बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

श्री ज्योतिबा यात्रेनिमित्त आलेल्या पाहुण्यांच्या तसेच ग्रामस्थांच्या मनोरंजनासाठी रात्री नऊ वाजता हिंदी-मराठी गाण्यांच्या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले. ४ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता सामुदायिक आंबिल कार्यक्रम झाला.

तसेच रात्री नऊ वाजता "मायबोली महाराष्ट्राची" या मनोरंजनात्मक ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण यात्रा उत्सवात ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

गुणवंत पाल्य व गुणवंत सभासदांचा विशेष सत्कार

# रयत सेवक बँक, मंचर शाखेकडून गुणवंतांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सातारा यांच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त मंचर शाखेच्या वतीने कार्यक्षेत्रातील सभासदांचे गुणवंत पाल्य व गुणवंत सभासदांचा गुणगौरव समारंभ कर्मवीर सभागृह, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक मंचर शाखेचे चेअरमन संदीप चव्हाण यांनी केले. त्यांनी बँकेचा इतिहास, सद्यस्थिती तसेच बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य व भीमाशंकर सहकारी साखर कारखाना चे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून राजाराम बाणखेले, व्हाइस चेअरमन दिलीपराव डहाळे, निलेश बाणखेले, चंद्रकांत वाव्हळ, सहाय्यक विभागीय अधिकारी दत्तात्रय गायकवाड, संचालक दीपक भोये, ज्योत्स्ना बाळसराफ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा, रयत प्रज्ञाशोध, एनएमएमएस, दहावी-बारावी बोर्ड परीक्षा तसेच क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच एमबीबीएस, बीएचएमएस, बीएएमएस या अभ्यासक्रमांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नेट-सेट पात्र शिक्षकांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

मे अखेरपर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना चांदीचे नाणे देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात बँकेच्या कार्याचे कौतुक करत गुणवंत विद्यार्थ्यांचे व सभासदांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात बाळासाहेब बेंडे यांनी बँकेच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी अधिक सहाय्य देण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन संदीप चव्हाण, संजय गोरडे, दिगंबर उंडे, शाखाधिकारी दत्तात्रय निर्मळ व बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी केले. सूत्रसंचालन केशव टेमकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय गोरडे यांनी केले.

---

## सैय्यदशाह वली बाबांचा उरूस साध्या पद्धतीने साजरा होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** इंदापूर तालुक्यातील सणसर येथे सैय्यदशाह वली बाबा उरूस यावर्षी साध्या पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उत्सव समितीचे अध्यक्ष शफिक शेख यांनी दिली.

यावेळी हाजी अयुब सय्यद, आझाद तरुण मंडळाचे संस्थापक प्रकाश शिंदे, माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे, शंकर सोनवणे, मुस्तफा सय्यद, युनूस सय्यद, रज्जाक मुजावर आदी उपस्थित होते.

उत्सव समितीने यंदा उरूसनिमित्त होणारे सर्व मनोरंजनात्मक कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच गावातून काढली जाणारी पारंपरिक मिरवणूकही यावर्षी रद्द करण्यात आली आहे. उरूस केवळ धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे.

१२ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत उरूस होणार असून, १२ एप्रिल रोजी बाबांचा संदल, १३ एप्रिल रोजी मुख्य उरूस आणि १४ एप्रिल रोजी झेंडा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

उरूसनिमित्त दर्ग्याचे सुशोभीकरण करण्यात आले असून भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### दहशतवादी गटाचा पर्दाफाश

**चंदीगड:** पंजाब पोलिसांनी पाकिस्तानच्या आयएसआय-समर्थित एका दहशतवादी गटाचा पर्दाफाश करत तीन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून दोन हँड ग्रेनेड आणि एक ग्लॉक पिस्तूल जप्त केले आहे, अशी माहिती एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सोमवारी दिली. या ग्रेनेडवर पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीचे चिन्ह असून, ते सीमापार संबंध दर्शवतात.

### काँग्रेस आणि भाजप यांच्यात सामंजस्य

**बेथुआडाहारी (पश्चिम बंगाल)** : टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांनी सोमवारी आरोप केला की, भाजपने काँग्रेस आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्यासोबत 'गुप्त समझोता' केला आहे. तसेच, पश्चिम बंगालमधील अनेक आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांना निवडणूक निरीक्षक म्हणून तामिळनाडूमध्ये पाठवण्यात आल्याने विकासकामांमध्ये अडथळा येत असल्याचा दावाही त्यांनी केला. पाच राज्यांमध्ये एकाच वेळी निवडणुका होत असूनही, आयोगाने इतर निवडणूक होणाऱ्या राज्यांमधील मोजक्याच अधिकाऱ्यांच्या तुलनेत पश्चिम बंगालमध्ये सुमारे ५०० अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या, असा आरोपही त्यांनी केला.


### अमली पदार्थ तस्कराला अटक

**श्रीनगर** : जम्मू आणि काश्मीरच्या पुलवामा येथे पोलिसांनी सोमवारी एका संशयित अमली पदार्थ तस्कराला अटक केली आणि त्याच्याकडून ३९२ ग्रॅम प्रतिबंधित पदार्थ जप्त केला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. आरोपी विकास अहमद लोन याला गंगू क्रॉसिंगजवळील सर्क्युलर रोडवर उभारलेल्या तपासणी नाक्यावर अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. "अमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील आपली मोहीम सुरू ठेवत, जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी पुलवामा येथे एका अमली पदार्थ तस्कराला अटक केली असून त्याच्या ताब्यातून प्रतिबंधित पदार्थ जप्त केले आहेत," असे पोलीस प्रवक्त्याने सांगितले.

### होर्मुझ सामुद्रधुनीतून आठवे जहाज मार्गस्थ

# भारतीय जहाजांची सुरक्षित वाटचाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय ध्वज असलेल्या एलपीजी वाहक जहाजांची होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित वाहतूक सुरू असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी सोमवारी दिली. भारतीय ध्वज असलेल्या 'ग्रीन आशा' या जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीरित्या पार केली असून २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या संघर्षानंतर या मार्गावरून जाणारे हे आठवे एलपीजी वाहक जहाज ठरले आहे. यापूर्वी 'ग्रीन सान्वी' या आणखी एका मोठ्या गॅस वाहक जहाजाने शुक्रवारी रात्री सुमारे ४६,६५० मेट्रिक टन द्रवीकृत पेट्रोलियम गॅस (एलपीजी) घेऊन सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली होती.

दरम्यान, २८ मार्च रोजी ४७,००० मेट्रिक टन एलपीजीची खेप गुजरातमधील जामनगर येथील डीपीए कांडलाच्या वडीनार टर्मिनलवर पोहोचली. एमटी जग वसंत हे जहाज नांगरलेल्या स्थितीत असताना शिप-टू-शिप प्रक्रियेद्वारे माल दुसऱ्या जहाजावर हस्तांतरित केला जाणार आहे.

सुरक्षेच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर या भागातून प्रवास करणाऱ्या व्यापारी जहाजांना मदत करण्यासाठी भारतीय नौदलाच्या युद्धनौका सज्ज ठेवण्यात आल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग मिळावा यासाठी केंद्र सरकार इराणी अधिकाऱ्यांशी चर्चा करत आहे. नौवहन मंत्रालयाच्या माहितीनुसार, सध्या पर्शियन आखातात सुमारे ४८५ खलाशांसह १८ भारतीय जहाजे कार्यरत आहेत. सर्व जहाजे आणि खलाशांच्या सुरक्षिततेवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून ते सुरक्षित असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, परराष्ट्र मंत्रालय, परदेशातील भारतीय दूतावास आणि इतर संबंधित संस्थांशी सातत्याने समन्वय ठेवला जात आहे. आतापर्यंत ९६४ हून अधिक खलाशांना मायदेशी परत आणण्यात आले असून देशातील सर्व बंदरांचे कामकाज सुरळीत सुरू आहे. पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशातील बदलत्या सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत सुमारे ५.९८ लाख प्रवासी भारतात परतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# अभिनेता विजयचा द्रविड पक्षांसाठी धोका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इरोड :** अभिनेता-राजकारणी विजय हे द्रविड राजकारणातील दोन प्रमुख पक्षांसाठी मोठे आव्हान ठरत असून त्यांच्या मतपेढ्यांवर परिणाम होत आहे, असा दावा नांजिल संबथ यांनी रविवारी केला.

पत्रकारांशी बोलताना संबथ यांनी द्रविड मुनेत्र कळघम आणि अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम या दोन प्रमुख द्रविड पक्षांवर निशाणा साधला. अनेक राजकीय पक्ष आणि सामाजिक गटांशी युती केल्यामुळे या पक्षांची मतपेढी कमी झाल्याचा दावा त्यांनी केला.

संबथ म्हणाले, डीएमके आपल्या पैशाच्या ताकदीवर अवलंबून आहे, तर टीव्हीके लोकांच्या विश्वासावर अवलंबून आहे. "आम्ही कोणत्याही युतीशिवाय निवडणूक लढवत आहोत. डीएमकेने २६ पक्षांवर आणि ७५ जातीय गटांवर विश्वास ठेवला आहे, तर एआयएडीएमकेने एका राष्ट्रीय पक्षासह १० पक्षांशी युती केली आहे," असे त्यांनी सांगितले.

दोन्ही पक्षांची मतपेढी घटल्याचा दावाही त्यांनी केला. "पूर्वी ३५ टक्के असलेली डीएमकेची मतपेढी आता २० टक्क्यांपर्यंत घसरली आहे. तर जे. जयललिता यांच्या निधनाच्या वेळी ४५ टक्के असलेली एआयएडीएमकेची मतपेढी आता १९ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. विजय हे त्यांच्यासाठी धोका ठरत आहेत. ते ज्या प्रकारे मोठी गर्दी जमवतात, तसे इतर कोणताही पक्षनेता करू शकत नाही," असे संबथ म्हणाले. तसेच त्यांनी एम. के. स्टॅलिन, उदयनिधी स्टॅलिन आणि कनिमोळी करुणानिधी यांच्या प्रचार सभांवरही टीका केली. "या सभांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. सभांमध्ये गर्दी टिकवून ठेवण्यासाठी डीएमकेला संघर्ष करावा लागत आहे," असा आरोप त्यांनी केला.

# दिल्ली विधानसभेत गंभीर सुरक्षा भंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राजधानीत सुरक्षेचा गंभीर भंग झाल्याची घटना सोमवारी समोर आली. एका मुखवटा घातलेल्या व्यक्तीने एसयूव्ही गाडी थेट दिल्ली विधानसभेच्या आवारात घुसवून अध्यक्षांच्या कार्यालयाबाहेर फुलांचा गुच्छ ठेवला आणि त्याच मार्गाने पसार झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, उत्तर प्रदेश नोंदणी क्रमांक असलेल्या वाहनाने दुपारी सुमारे २ वाजता गेट क्रमांक २ तोडून संकुलात प्रवेश केला. हे मुख्य प्रवेशद्वार नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज नसताना या भागात सुरक्षा तुलनेने कमी असते, असे सूत्रांनी सांगितले.

चालक विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांच्या कार्यालयाच्या दिशेने गेला आणि पोर्चजवळ फुलांचा गुच्छ ठेवून घाईघाईने वाहनातून बाहेर पडून पसार झाला, असे दिल्ली सचिवालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले. या घटनेमुळे गंभीर सुरक्षा चिंता निर्माण झाली असून अधिकारी याकडे संभाव्य सुरक्षा उल्लंघन म्हणून पाहत आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांची पथके, बॉम्ब निकामी करणारे पथक आणि श्वान पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. कोणताही स्फोटक धोका नाही याची खात्री करण्यासाठी परिसराची कसून तपासणी करण्यात आली आणि राजधानीत हाय अलर्ट जारी करण्यात आला.

विशेष पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) रविंद्र यादव घटनास्थळी पोहोचून त्यांनी तपासाचे पर्यवेक्षण केले. पोलिसांनी परिसरातील आणि आजूबाजूच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून घटनाक्रमाची पुनर्रचना करण्याचे काम सुरू आहे. संशयित वाहनाची ओळख पटवण्यासाठी अधिकारी सीसीटीव्ही दृश्यांची तपासणी करत आहेत. वाहनाच्या हालचालींचा मागोवा घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# जे. पी. नड्डा यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिनसुकिया :** आसाममधील तिनसुकिया येथे केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी सोमवारी काँग्रेसवर जोरदार टीका करत चहा उत्पादक आदिवासी समाजाला 'व्होट बँक' म्हणून वापरल्याचा आरोप केला. दर पाच वर्षांनी मतांसाठी या समाजाची 'कापणी' करण्यात आली, मात्र त्यांच्या कल्याणासाठी कोणतेही ठोस काम करण्यात आले नाही, असा आरोप त्यांनी केला.

भाजपचे डुमडुमा मतदारसंघातील उमेदवार रुपेश गोवाला यांच्या समर्थनार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी असा दावा केला की, आसाममध्ये काँग्रेसच्या सत्ताकाळात घुसखोरांसाठी लाल गालिचा अंथरला गेला. नड्डा म्हणाले, "काँग्रेसने चहा उत्पादक आदिवासींना दर पाच वर्षांनी कापणी करता येणारी व्होट बँक म्हणून वागवले. त्यामुळे या समाजाचे भविष्य अंधारात ढकलले गेले."

आसाममधील चहा जमाती या एकोणिसाव्या शतकात वसाहतवादी काळात सध्याच्या झारखंड, ओडिशा आणि बिहारमधील आदिवासी पट्ट्यांतून आणलेल्या मजुरांचे वंशज आहेत आणि राज्यातील अनेक मतदारसंघांमध्ये त्यांचे मोठे राजकीय महत्त्व आहे.

केंद्रीय मंत्र्यांनी आरोप केला की, काँग्रेसने तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी घुसखोरांना आसाममध्ये आमंत्रित केले आणि त्यांना आधार व आयुष्मान भारत कार्ड देऊन येथे आश्रय दिला. "हे लोक आदिवासी आणि गरीबांची जमीन बळकावत आहेत. भाजप ही जमीन परत मिळवेल आणि अवैध स्थलांतरितांना हाकलून देईल," असे ते म्हणाले. मतदार यादीतून अशा लोकांची नावे वगळण्याची प्रक्रिया सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला. यावेळी त्यांनी काँग्रेसवर राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावरूनही टीका करत, आसाममध्ये पंतप्रधानांच्या भूमिकेबाबत काँग्रेसने पाकिस्तानच्या भूमिकेचे समर्थन केल्याचा आरोप केला.

पूर्व आसाममधील या मतदारसंघात मोठ्या संख्येने असलेल्या चहा जमातींच्या लोकांचे घुसखोरांविरोधातील भूमिकेबद्दल त्यांनी कौतुक केले. "घुसखोरांना येथे स्थायिक होऊ न देता भारतमातेचे भविष्य वाचवल्याबद्दल मी चहा जमातीच्या लोकांना सलाम करतो," असे नड्डा म्हणाले. राज्यात काँग्रेसच्या सत्ताकाळात हिंसाचार, हत्या, संप, अशांतता आणि संचारबंदी होती, असा आरोप करत त्यांनी गेल्या दशकात भाजप सरकारमुळे आसाममध्ये शांतता, स्थैर्य आणि विकास झाल्याचा दावा केला.

# टीएमसी उमेदवारासह सात जणांविरोधात गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** दक्षिण कोलकात्यातील पर्णाश्री परिसरात झालेल्या कथित तोडफोडीप्रकरणी कोलकाता पोलिसांनी टीएमसी उमेदवार रत्ना चट्टोपाध्याय आणि इतर सहा जणांविरोधात एफआयआर दाखल केला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

५ एप्रिल रोजी आगामी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान परिसरात गोंधळ झाल्याच्या तक्रारीनंतर हा गुन्हा नोंदवण्यात आला. पोलिसांच्या माहितीनुसार, रविवारी चट्टोपाध्याय पर्णाश्री परिसरात तोडफोड करत असल्याचे आढळून आले, त्यानंतर एफआयआर दाखल करण्यात आला. घटनाक्रम आणि एफआयआरमध्ये नमूद केलेल्या व्यक्तींच्या भूमिकेची खात्री करण्यासाठी तपास सुरू आहे.

भाजप नेते मनोज हलदर यांनी चट्टोपाध्याय आणि इतर सहा जणांविरुद्ध तक्रार दाखल केल्यानंतर हा गुन्हा नोंदवण्यात आला. तक्रारीत त्यांनी आरोप केला आहे की, सात टीएमसी कार्यकर्त्यांनी त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना विनाकारण अडवले, एका सहकाऱ्याला मारहाण केली आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यालयातून लॅपटॉप व इतर साहित्य चोरले. तसेच, आरोपींनी पक्षाच्या कार्यालयासमोरील झेंडे आणि बॅनर फाडून परिसरात तोडफोड केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

भाजपचे बेहाला पश्चिमचे उमेदवार इंद्रनील खान यांनीही पर्णाश्री पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून टीएमसी कार्यकर्त्यांनी पक्षाच्या निवडणूक कार्यालयाची तोडफोड केल्याचा आरोप केला आहे. निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, जिल्हा प्रशासनाकडून सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे.

### उन्नाव प्रकरणी मेच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी

# सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** २०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात भाजपचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर यांच्या जन्मठेपेच्या शिक्षेच्या स्थगितीला आव्हान देणाऱ्या केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) च्या याचिकेवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालय ने सोमवारी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुढे ढकलली.

सरन्यायाधीश सुर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुरू असलेल्या शबरीमला पुनर्विलोकन प्रकरण यावरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतरच हे प्रकरण हाती घेतले जाईल.

सेंगर यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी बाजू मांडताना, दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या पीडितेच्या वडिलांच्या कथित पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणाकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. त्या प्रकरणात सेंगर यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली असून, "दहा वर्षांचा कालावधी लवकरच पूर्ण होणार असतानाही उच्च न्यायालयात ठोस सुनावणी झालेली नाही. त्यामुळे जामीन मंजूर व्हावा," असा युक्तिवाद त्यांनी केला. यावर पीडितेचे वकील मेहमूद प्राचा यांनी उच्च न्यायालयात केवळ एकदाच स्थगिती मागितल्याचे स्पष्ट करत रोहतगी यांचा आरोप फेटाळला.

दरम्यान, सेंगर आरोपी असलेल्या दुसऱ्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयात कोणतीही स्थगिती मागितली जाणार नाही, याबाबत दोन्ही पक्षांनी सहमती दर्शविल्याची नोंद खंडपीठाने घेतली. "उच्च न्यायालयात वकील पूर्ण सहकार्य करतील," असे सरन्यायाधीशांनी नमूद केले.

गेल्या वर्षी २९ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देत सेंगर यांना कोठडीतून सोडले जाणार नाही, असे स्पष्ट केले होते. दिल्ली उच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशात सेंगर यांच्या जन्मठेपेच्या शिक्षेला अपिलाचा निकाल लागेपर्यंत स्थगिती दिली होती.

उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले होते की, पॉक्सो कायद्याच्या कलम ५ (सी) अंतर्गत दोषी ठरवण्यात आले असले तरी भारतीय दंड संहितेनुसार 'लोकसेवक' या व्याख्येत निवडून आलेला प्रतिनिधी बसत नाही. या मुद्द्यावर महत्त्वाचे कायदेशीर प्रश्न उपस्थित झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षणात नमूद केले आहे. सीबीआयतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हा "अल्पवयीन मुलीवरील अत्यंत गंभीर गुन्हा" असल्याचे सांगत उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्याची मागणी केली होती.

# व्याघ्र प्रकल्पांत १२ तासांत दोन वाघांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील सातपुडा व्याघ्र प्रकल्प आणि कान्हा व्याघ्र प्रकल्प येथे प्रजननाचा हंगाम संपत असताना प्रौढ वाघांमधील प्रादेशिक संघर्षामुळे अवघ्या १२ तासांच्या अंतराने दोन वाघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यात चार महिन्यांचा नर बछडा आणि दहा वर्षांची वाघीण यांचा समावेश आहे.

नर्मदपुरम जिल्ह्यातील सातपुडा व्याघ्र प्रकल्पाच्या मतकुली रेंजमधील घनदाट जंगलात चार महिन्यांचा नर वाघाचा बछडा मृतावस्थेत आढळला. अधिकृत सूत्रांनुसार, शनिवारी संध्याकाळी जंगलात गुरगुरण्याचा आवाज ऐकू आला होता. गस्त पथक घटनास्थळी पोहोचले असता त्यांना बछडा मृतावस्थेत आढळला.

सातपुडा व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक राखी नंदा यांनी सांगितले की, शवविच्छेदनात बछड्याच्या शरीरावर नखांचे आणि दातांचे अनेक खोल जखमा आढळल्या. परिसरातील पावलांचे ठसे तपासल्यावर प्रजननाच्या हंगामात त्या भागात प्रौढ नर आणि मादी वाघांची उपस्थिती असल्याचे स्पष्ट झाले. एका प्रौढ नर वाघानेच या बछड्यावर हल्ला केल्याची दाट शक्यता आहे. सुमारे १५० किमी अंतरावर असलेल्या कान्हा व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात रविवारी सकाळी दहा वर्षांची 'सुनैना' (टी-१२२) नावाची वाघीण मृतावस्थेत आढळली. सुनैना ही कान्हा प्रकल्पातील सर्वाधिक लोकप्रिय आणि वारंवार दिसणाऱ्या वाघांपैकी एक होती.

कान्हा व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक रवींद्र मणी त्रिपाठी यांनी सांगितले की, पशुवैद्यकीय तज्ज्ञ आणि श्वान पथकाने घटनास्थळाची तपासणी केली असता त्या परिसरात अनेक प्रौढ वाघांच्या हालचाली आढळल्या. जखमांचे स्वरूप पाहता दुसऱ्या प्रौढ वाघासोबत झालेल्या प्रादेशिक लढाईत वाघिणीचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. आतापर्यंत मध्य प्रदेशात १६ वाघांचा मृत्यू झाला असून, देशातील यावर्षी झालेल्या एकूण वाघ मृत्यूंपैकी हे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. कान्हा व्याघ्र प्रकल्पात सुमारे १२० प्रौढ वाघ आणि ४० बछडे आहेत. बालाघाट जिल्ह्यातील लगतच्या जंगलांमध्येही वाघांची संख्या मोठी असल्याने हा परिसर महत्त्वाचा वाघ कॉरिडॉर मानला जातो.

### सिद्धरामय्याच मुख्यमंत्रीपदी राहतील

**म्हैसूर :** कर्नाटकचे गृहमंत्री जी परमेश्वर यांनी सोमवारी ठामपणे सांगितले की, "सध्याच्या परिस्थितीत" सिद्धरामय्या पूर्ण पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी मुख्यमंत्रीपदी कायम राहतील. मात्र, नेतृत्वबदलासंबंधीचा कोणताही निर्णय पूर्णपणे काँग्रेसच्या हायकमांडवर अवलंबून आहे, असे त्यांनी सांगितले. आम्हाला (नेतृत्व बदलाविषयी) काहीच माहिती नाही. बदल होईल असे कोणी म्हटले? कोण बदलणार? हे काम काँग्रेस कमिटीला करावे लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### मोकाट जनावरांबाबत नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशभरातील राष्ट्रीय व राज्य महामार्गांवर मोकाट जनावरांचा वावर रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या मागणीवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारसह संबंधित सर्व पक्षांना नोटीस बजावली. चार आठवड्यांच्या आत उत्तर दाखल करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, अनेक राज्ये १० टक्के गोवंश उपकर आकारत असली तरी प्रत्यक्षात मोकाट जनावरांच्या समस्येवर ठोस उपाययोजना होताना दिसत नाहीत. नॅशनल हायवेज ऑथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) च्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, भटक्या कुत्र्यांच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला असून त्या प्रकरणात महामार्गांवर भटक्या प्राण्यांच्या प्रवेशाचाही मुद्दा समाविष्ट आहे.

'लॉयर्स फॉर ह्युमन राइट्स इंटरनॅशनल' या संस्थेच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेत महामार्गांवर जनावरांचा शिरकाव रोखण्यासाठी एकसमान राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्गांवर, विशेषतः अपघातप्रवण भागांमध्ये, अनिवार्य कुंपण उभारण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### आणीबाणीनंतर अनुभवला राजकीय अस्थिरतेचा काळ

# तीन वर्षांत चार मुख्यमंत्री केरळने बदललेले पाहिले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तिरुवनंतपुरम :** आणीबाणीनंतर देशभरात बदललेल्या राजकीय परिस्थितीचा मोठा परिणाम केरळच्या राजकारणावरही झाला. १९७७ ते १९७९ या अवघ्या तीन वर्षांच्या कालावधीत बदलत्या राजकीय आघाड्या, अंतर्गत पक्षीय संघर्ष आणि वैचारिक मतभेद यामुळे राज्यात वारंवार सत्तांतर झाले आणि या काळात तब्बल चार मुख्यमंत्र्यांनी पदभार स्वीकारला व सोडला.

आणीबाणीनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर २५ मार्च १९७७ रोजी के. करुणाकरन यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि या राजकीय घडामोडींची सुरुवात झाली. एका विद्यार्थ्याची पोलीस कोठडी नाकारण्यासाठी खोटे प्रतिज्ञापत्र सादर केल्याचा आरोप झाल्यानंतर करुणाकरन यांच्यावर प्रचंड दबाव निर्माण झाला आणि त्यांनी २५ एप्रिल १९७७ रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे त्यांचा कार्यकाळ अवघ्या एका महिन्यात संपुष्टात आला. करुणाकरन यांच्या राजीनाम्यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ने नेतृत्वाची जबाबदारी ए. के. अँटनी यांच्याकडे सोपवली. २७ एप्रिल १९७७ रोजी वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि ते केरळचे सर्वात तरुण मुख्यमंत्री ठरले. मात्र, त्यांचे सरकार स्थिर राहू शकले नाही. काँग्रेस पक्षात त्या काळात मोठे अंतर्गत मतभेद होते आणि पक्ष इंदिरा गांधी समर्थक व विरोधक अशा दोन गटांमध्ये विभागला गेला होता. पक्षाच्या बदलत्या राष्ट्रीय भूमिकेच्या निषेधार्थ अँटनी हे इंदिरा गांधी विरोधी गटात सामील झाले आणि अखेरीस त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. अँटनी यांच्या राजीनाम्यानंतर २८ ऑक्टोबर १९७८ रोजी पी. के. वासुदेवन नायर यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. ते भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय) चे नेते होते. त्यांच्या कार्यकाळात आघाडी सरकार स्थिर ठेवण्याचे प्रयत्न झाले. विविध पक्षांमध्ये तडजोडी करून सरकार चालवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, राष्ट्रीय पातळीवरील राजकीय बदल आणि विशेषतः डाव्या पक्षांच्या एकतेसाठी सुरू झालेल्या हालचालींमुळे राज्यातील राजकीय समीकरणे पुन्हा बदलली. परिणामी, ऑक्टोबर १९७९ मध्ये वासुदेवन नायर यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. यानंतर पुन्हा अनिश्चितता निर्माण झाली. स्पष्ट बहुमत नसल्याने विविध पक्षांच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. काँग्रेस (उर्स), केरळ काँग्रेसच्या मणी आणि जोसेफ गटांच्या पाठिंब्याने सी. एच. मोहम्मद कोया यांनी १२ ऑक्टोबर १९७९ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ते इंडियन युनियन मुस्लिम लीगचे नेते होते. मात्र, हे सरकारही फार काळ टिकू शकले नाही. ए. के. अँटनी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस गटाने सरकारवरील पाठिंबा काढून घेतल्यानंतर कोया सरकार अल्पमतात आले. अखेरीस डिसेंबर १९७९ मध्ये मोहम्मद कोया यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांचे मंत्रिमंडळ अवघे एक महिना आणि वीस दिवसच टिकले. यानंतर लगेचच केरळ विधानसभा विसर्जित करण्यात आली आणि राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. आणीबाणीनंतरचा १९७७ ते १९७९ हा कालावधी केरळच्या राजकीय इतिहासातील सर्वात अस्थिर काळांपैकी एक मानला जातो.